# JAWAHARLAL NEHRU ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, WADI.

## 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा महाविद्यालयीन समितीची सभा'

१) मा. सहसंचालक,नागपूर विभाग यांचे कार्यालयीन पत्र उशिरा/कार्यासन-नागपूर/ सर्व विद्यापीठे महाविद्यालये/6493/2024 नुसार, "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"या उपक्रमाची महाविद्यालयीन समितीची सभा दिनांक 26 डिसेंबर 2024 ला, दुपारी 4 वाजता प्राचार्य कक्षामध्ये महाविद्यालयाचे प्रा. डॉ.संजय टेकाडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेला खालील सदस्य उपस्थित होते.

१) डॉक्टर संजय टेकाडे - प्राचार्य
२)डॉ.प्रेमलता कुऱ्हेकर - ग्रंथपाल
3)डॉ.लीना फाटे - भाषा शिक्षक( इंग्रजी)
४)प्रा.आकांक्षा बांगर - भाषा शिक्षक (हिंदी)
5) डॉ.वैशाली धनविजय - भाषा शिक्षक (मराठी)
6)डॉ.काशिनाथ मानमोडे - रा. से. यो. अधिकारी.

**सभेत शासनाच्या निर्देशानुसार खालील विषयावर चर्चा करून ठराव संमत करण्यात आले.**

विषय क्रमांक १) "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याबाबत.
ठराव क्रमांक १) माननीय सभेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे सर यांनी "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा विषय चर्चेसाठी मांडला. त्यानुसार संबंधित कार्यक्रमाची रूपरेषा सूचनाफलक, एस,एम,एस संकेतस्थळ याद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे ठरले.

विषय क्र. 2) ग्रंथालयाची स्वच्छता करण्याबाबत.
ठराव क्रमांक 2) विद्यार्थ्यां द्वारे ग्रंथालयाची स्वच्छता दि. 30 डिसेंबर 2024 रोजी सकाळी 11 वाजता करण्याचे ठरले.

विषय क्र. 3)ग्रंथप्रदर्शनिचे आयोजन करण्याबाबत.
ठराव क्र. 3) विद्यार्थ्यांच्या मनामध्ये ग्रंथ वाचनाची आवड निर्माण करण्याच्या हेतूने ग्रंथ प्रदर्शनेचे आयोजन दिनांक 30 डिसेंबर व 31 डिसेंबर २०२४ रोजी करण्याचे ठरवण्यात आले.

विषय क्र. 4) वाचन कौशल्य कार्यशाळा आयोजित करण्याबाबत.
ठराव क्र. 4) विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, वाचनाचे महत्त्व पटावे या हेतूने दिनांक 1 जानेवारी 2025 रोजी सकाळी 11 वाजता वाचन कौशल्य कार्यशाळा महाविद्यालयातील सभागृहात आयोजित करण्याचे ठरले.

विषय क्र. 5) लेखक व विद्यार्थी यांच्यामधील वाचन संवाद कार्यक्रमाचे आयोजन व निबंध स्पर्धा आयोजित करण्याबाबत.
ठराव क्र. 5)लेखक व विद्यार्थी यांच्यामधील वाचन संवाद वाढावा यासाठी डॉ. विनोद जिवनतारे सर यांचे कथेवर आधारित व्याख्यान घेण्याचे ठरले व वाचन "कौशल्याचे महत्त्व" या विषयावर विद्यार्थ्यांकडून निबंध मागविण्यात येतील.

विषय क्र. 6)विजेत्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र/ बक्षीसे देण्याबाबत.
ठराव क्र. 6)उपरोक्त सर्व कार्यक्रमास सहभागी विद्यार्थ्यांच्या कौशल्यांचे मूल्यांकन करून सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येतील व या उपक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना अनुक्रमे 1,2 व 3 याप्रमाणे बक्षीस देण्यात येतील. असे ठरवण्यात आले.

याप्रमाणे वाचन "संकल्प महाराष्ट्राचा"कार्यक्रमाची मा. अध्यक्ष यांच्या संमतीने सभेची सांगता करण्यात आली.

सभाध्यक्ष/प्राचार्य

Principal
Jawaharlal Nehru Arts, Comm. & Science College Wadi, Nagpur